# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./१८०३ /२०२२ दि. २४/०५/२०२२

## परिपत्रक

विषय:- ६ जून हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/ प्रक्र३०/विशि-५, दि. ०३/०६/२०२१.

२. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. उशिनाग/आस्था/शिवस्वराज्य दिन/२८७३ /२०२२, दि. १९/०५/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थामध्ये ६ जून हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत निर्देश प्राप्त असून सदर दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस / पुतळ्यास अभिवादन करावे व महाराष्ट्र गीत आणि राष्ट्रगीताचे गायन करावे तसेच संदर्भिय शासन परिपत्रकात दिलेल्या सुचनेनुसार विविध स्पर्धांचे / उपक्रमांचे आयोजन करावे, असे सुचित केले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
६. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
७. डॉ. विवेक जोशी, सहयोगी प्राध्यापक (इंग्रजी), डॉ. रजनी वाढई, सहाय्यक प्राध्यापक (समाजशास्त्र), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना विद्यापीठात उपरोक्तनुसार कार्यक्रम आयोजनाच्या अनुषंगाने कार्यवाहीकरीता अग्रेषित.
८. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
९. श्री. सचिन सेलोकर, वरिष्ठ विजतंत्री / श्री. अफझलबेग मिर्झा, कनिष्ठ विजतंत्री यांनी उपरोक्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्युत व्यवस्था, साऊंड सिस्टम व इतर तत्सम बाबींची व्यवस्था सांभाळावी.
१०. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,

जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१

Web : www.dirhe.org.in/jdnagpur

E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com

फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/ आस्था/ शिवस्वराज्य दिन/ 2163 /२०२२ दिनांक १९ /०५/२०२२

प्रति,

१. सर्व संचालक/प्राचार्य/अधिक्षक
शासकीय महाविद्यालये/संस्था/वसतीगृह

२. सर्व प्राचार्य
अशासकीय कला,वाणिज्य,विज्ञान,अध्यापक,विधी महाविद्यालये

३. सर्व कुलसचिव,
अकृषी विद्यापीठे ,नागपूर ,रामटेक,गडचिरोली

**विषय : ६ जून हा दिवस " शिवस्वराज्य दिन " म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :** शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२१/प्र.क्र.३०/विशि-५ दिनांक.०३ जून २०२१

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयान्वये सर्व संस्थेमध्ये **६ जून हा दिवस " शिवस्वराज्य दिन "** म्हणून साजरा करावे तसेच सदर शासन निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस/पुतळयास अभिवादन करावे व महाराष्ट्र गीत आणि राष्ट्रगीताचे गायन करावे. तसेच शासन निर्णयात दिलेल्या सूचनेनुसार स्पर्धांचे/उपक्रमांचे आयोजन करावा.

(डॉ.संजय ठाकरे)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

प्रत- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१ यांना माहितीकरीता सविनय सादर.

'६ जून' हा दिवस राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण -२०२१/प्र.क्र.३०/विशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ जून, २०२१

**शासन परिपत्रक :**

रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठासही मन न दाखवणे, अशी आज्ञा देणारा इतिहासातील पहिला राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. परकीय आणि स्वकीय अशा जुलमी सत्ताधिशांशी वतनदारांशी अनेक लढाया, युध्दे लढून या महाराष्ट्र भूमीत स्वराज्याची निर्मिती केली. जुलमी राजवटी संपुष्टात आणणेसाठी सर्व जाती-धर्माच्या अठरापगड बारा बलुतेदार, जिवाभावाचे मावळे एकत्र करुन हा लढा दिला. जनतेसाठी कसे राज्य करावे याचा आदर्श निर्माण केला. आपल्या राज्यातील जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी अनेक वटहुकूम काढले. मराठी भाषेतून राज्यकारभार चालविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यभाषा व्यवहारकोश तयार केला होता. या ग्रंथामध्ये फारसी शब्दांच्या संदर्भासाठी संस्कृत शब्द दिलेले आहेत. या ग्रंथाद्वारे महाराजांनी व्यवहाराचे मराठीकरण करण्याचा प्रयत्न केला.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या, लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजे ६ जून, १६७४ म्हणजेच "**शिवराज्याभिषेक दिन**" होय. हे रयतेचे राज्य शाश्वत, चिरंतन रहावे म्हणून या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता व शिवाजी महाराज छत्रपती झाले होते. याच दिवशी स्वराज्याचे सार्वभौमत्व दुर्ग रायगडाच्या राजसदरेवरुन घोषित झाले. याच दिवशी श्री शिवराज्याभिषेक शकाची निर्मिती करुन महाराज शककर्ते ही झाले, तो हा शुभदिन होय. याच पवित्र दिवशी शिवकालगणनेला प्रारंभ झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिवस स्वराज्याची, सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याची मागणी विविध स्तरातून होत आहे.

ही बाब विचारात घेऊन दरवर्षी दिनांक '६ जून' हा दिवस संपूर्ण राज्यातील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये **"शिवस्वराज्यदिन"** म्हणून साजरा करण्यात यावा. दरवर्षी या दिवशी राज्यातील

सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये सकाळी ११.०० वा. सर्व पदाधिकारी, अधिकारी / कर्मचारी व विद्यार्थी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस / पुतळयास अभिवादन करावे व महाराष्ट्र गीत आणि राष्ट्रगीताचे गायन करावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे महान कार्य विद्यार्थ्यांच्या मनावर प्रतिबिंबित व्हावे या दृष्टीने शिवचरित्रपर व्याख्यानांचे, पथनाटयांचे व इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. महाराजांच्या गड किल्ल्यांची विद्यार्थ्यांना महती कळावी म्हणून गड किल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन / लघुपट प्रदर्शन करण्यात यावे. तसेच निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गीत गायन/पोवाडा गायन स्पर्धा, क्रिडा व इतर स्पर्धांचे/उपक्रमांचे आयोजन व सामाजिक संदेश देणारी शिवज्योत रॅलीचे आयोजन करुन हा दिवस साजरा करावा.

हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०६०४११३१४२५१०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=880d6eb755bcb4455fe360baaa8797820b6265d75275a72f9fa31977bfe84c9, serialNumber=99eb928028df71ebdfcd2898e209d499192ad3899261fead42f7d38a3141ab69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2021.06.04 11:41:43 +05'30

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
२. मा. राज्य मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक,
४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे/संचालक तंत्रशिक्षण, मुंबई /संचालक, कला संचालनालय, मुंबई
६. निवडनस्ती (विशि-५)